कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे
क.का.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
डी.ज.पी नगर -१ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २३०४९१६
ई-मेल - principal-bed@kkwagh.edu.in

दिनांक :१८/१२/२०१८

# निर्भय कन्या अभियानातून विद्यार्थीनींमध्ये स्वसरंक्षणाची जागृती

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ, पुणे आणि के.के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निर्भय कन्या अभियान दि. १६ डिसेंबर २०१८ रोजी घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महिला हक्क संरक्षण समितीच्या अध्यक्षा मा. हेमा पटवर्धन, प्रा. डॉ. भूषण कर्डिले, मा.श्री. वसंत कर्डिले, समाजमाता पुरस्काराने गौरवान्वित सौ.शकुंतला कर्डिले, कराटे प्रशिक्षक मा.अनिता मुलाने, पोलिस उपनिरीक्षक सुशिला करोडवाल, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी सौ. सुवर्णा बत्तासे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात मा.प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले यांनी निर्भय कन्या अभियान राबविण्यामागचा विद्यापीठाचा हेतू स्पष्ट केला. ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व विद्यार्थीनीमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे. स्त्री ही अबला नसूल सबला आहे हा विचार प्रस्तापित केला. यात विद्यार्थीनीमध्ये बौध्दिक विकास, शारिरीक विकास, स्वजाणीवेचा विकास होणे अपेक्षित आहे. या योजनेतंर्गत विद्यार्थीनींना स्वःसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे, स्त्रीयांसाठी असलेल्या कायदयांची ओळख करुन देणे, त्यांचे हक्क, जबाबदारींची माहिती देणे. आणि आलेल्या संकटांना समर्थ पणे तोंड देण्यासाठी धैर्य निर्माण करणे आवश्यक आहे. परंतू या बरोबरच विद्यार्थीनींनी स्वांतत्र्य आणि स्वैराचार यातील फरक जाणून घेणे यातील फरक स्पष्ट केले. यस अभियानाचा विद्यार्थीनीनी स्वविकासासाठी उपयोग करुन घ्यावा असे आवाहन केले. प्रथम सत्रात शितोरिओ मार्शल आर्ट या संस्थेच्या मा. अनिता मुलाने यांनी विद्यार्थिनींना कराटेचे महत्त्व सांगून प्रत्यक्ष कराटेचे प्रशिक्षण दिले. रोजच्या जीवनात कराटेंच्या बेसिक स्टेप्स् किती महत्त्वपूर्ण ठरतात हे सांगितले. कराटे शिकल्यामुळे व्यक्तीत शिस्त रुजते, कामाप्रती समर्पण वाढते जगाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन वृध्दींगत होतो. आत्मविश्वास वाढतो, चित्त एकाग्रता वाढते, स्मृती तल्लख होण्यास मदत होते, सहकार्य भावना, संघ भावना, सहनशिलता, स्वनियंत्रण, शारीरिक स्वास्थ्य, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य उत्तम राहते असे स्पष्ट केले. प्रशिक्षणा दरम्यान वेगवेगळे पंचेस शिकवून स्वसंरक्षण कसे करावे हे प्रात्यक्षिकाद्वारे सांगितले आणि दररोज सकाळी व्यायाम केल्याने दिवसभर उत्साह टिकवून ठेवता येतो हे सांगितले.

द्विवतीय सत्रात महिला हक्क संरक्षण समितीच्या अध्यक्षा हेमा पटवर्धन यांनी महिला संरक्षण विषयक कायदे याविषयावर सविस्तर चर्चा केली. महिला संरक्षणासाठी विविध प्रकारचे कायदे असतात त्याविषयी जागृती होणे आवश्यक आहे कारण मुलींना शासनाने आपल्या संरक्षणासाठी तयार केलेल्या कायद्यांची माहिती नसते. आणि त्यामुळे निष्कारण त्या परिस्थितीच्या कशा बळी पडतात हे विविध घडलेल्या उदाहरणांद्वारे सांगितले. घरगुती छळ, मानसिक छळ, शारिरीक छळ रोखण्यासाठी महिला सुरक्षा कायदा किती महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो हे स्पष्ट केले. मुली आपले सासरचे, आईवडिलांचे

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
डी.जी.पी नगर -१ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई-मेल - principal-bed@kkwagh.edu.in

दि. २३/१२/२०१९

## के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

के.के. वाघ शिक्षण संस्थेच्या, सुवर्ण महोस्तव वर्षानिमित्त सरस्वतीनगर कॅम्पस व डी.जी.पी नगर कॅम्पस येथील सर्व महाविद्यालयांचा संयुक्त रित्या रक्तदान शिबिर कार्यक्रम दि. २३ डिसेंबर २०१९ रोजी के.के. वाघ शिक्षण संस्थेच्या सरस्वतीनगर संकूल येथे आयोजित करण्यात आलेला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन के.के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भूषण कर्डिले, वरिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. व्ही.एम.सेवलीकर, आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विभाग प्रमुख मा. म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी विद्यार्थ्यांचे वजन करुन हिमोग्लोबिन तपासण्यात आले व जे विद्यार्थी रक्तदान करण्यास पात्र आहेत अशा विद्यार्थ्यांना रक्तदान करण्याची संधी देवून प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्रा. उषा क्षत्रिय, प्रा. योगिता भामरे, प्रा. किर्ती चिले, प्रा. दिपाली सूर्यवंशी, प्रा. सुवर्णा बत्तासे, श्री. सोमनाथ गाजरे, श्री. सागर मुरकुटे, श्री. निरंजन शहाणे, कु.भाग्यश्री झोमन, श्री. भिकन बडगुजर, सौ. कविता झाडे हे उपस्थित होते.

Principal
K.K.Wagh College of Education
NASHIK

के.के.वाघ शिक्षणसंस्थेचे,

# के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय,नाशिक.

## के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातर्फे भाषा विकसन कार्यक्रमाचे भव्य उद्‌घाटन

के.के.वाघ शिक्षणसंस्थेचे के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक यांचे वतीने दि.23 जानेवारी 2021 रोजी भाषा विकसन कार्यक्रम (इंग्रजी) चे भव्य उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भूषण कर्डिले होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा.प्राध्यापक श्री.यशवंत ढगे हे उपस्थित होते. दीपप्रज्वलन मा.डॉ.भूषण कर्डिले, मा.प्रा.यशवंत ढगे,सौ.अश्विनी पवार, डॉ.निशा एंडाईत, सौ.अमृत राव यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.यशवंत ढगे यांनी इंग्रजी भाषा शिकणे किती सहजसुलभ आहे हे सांगून इंग्रजी भाषेचा प्रभाव आपल्या स्वत:च्या व्यक्तीमत्वावर होत असतो हे सांगितले. तसेच इंग्रजी भाषा किती गमतीशीर आहे हे सांगण्यासाठी Conceive and Delivery या शब्दांचे उदाहरण दिले. आपण आपले उच्चार कसे विकसित करू शकतो, यासाठी काय प्रयत्न केले पाहिजे हे स्पष्ट केले. या भाषा विकसन कार्यक्रमासाठी प्रा. ढगे यांनी स्वतः साहित्य तयार केले असून त्यात दैनंदिन जीवनातील प्रसंग इंग्रजीत कसे बोलावेत याची नोंद केलीय. छोटया छोटया टेबलच्या आधारे वाक्य तयार करण्यासाठी मार्गदर्शन केलेय. दैनंदिन संवादांची पुस्तिका तयार केली आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणत मा.प्राचार्य डॉ.भूषण कर्डिले यांनी आज इंग्रजी भाषा कशी जागतिक झाली आहे हे सांगून कोणतीही भाषा शिकण्यासाठी आधी ती ऐकली पाहितजे मग ती बोलता आली पाहिजे, नंतर वाचता आली पाहिजे आणि शेवटी लिहिता आली पाहिजे म्हणजेच भाषा शिकण्यासाठी मुलाचा आधी कान तयार करावा, नंतर जीभ, डोळे आणि स्वत:च्या मेंदूच्या आधारे विचारक्षमता विकसित करून लेखन करता आले पाहिजे. या भाषा विकसन कार्यक्रमासाठी विद्यार्थ्याला प्रत्येक कौशल्याचे जास्तीत जास्त अनुभव द्यावेत म्हणजे ती भाषा बोलण्यास जास्त मदत होते असे सांगितले.

यानंतर डॉ.निशा एंडाईत यांनी इंगजी चित्रपटाच्या सहा याने आपण किती सहजतेने इंग्रजी भाषा शिकू शकतो हे सांगितले. इंग्रजी चित्रपट पाहताना कोणत्या घटकांची काळजी घ्यावी हे सांगितले आणि Alternative Maths ही शॉर्ट फिल्म दाखविली.

कार्यक्रमाच सुत्रसंचालन प्रा. योगिता भामरे आणि किर्ती चित्ते यांनी केले अतिथी सत्कार प्राचार्य अश्विनी पवार यांनी केले तर अतिथी परिचय निशा एंडाईत यांनी केले व कार्यक्रमाचे प्रास्तारवि प्रा.योगिता भामरे यांनी केले. आभार सौ.कोमल निकम यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.उषा क्षत्रिय प्रा.दिपाली सूर्यवंशी, प्रा.सुवर्णा बत्तासे, प्रा.पल्लवी सावकार के.के.वाघ इंग्लिश स्कूल,नाशिक येथिल माधुरी निफाडे, सुचेता विसपूते, यांच्यासह शुभम भालेराव, दर्शना लोखंडे यांचे सहकार्य लाभले.

प्राचार्य,<br>
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय,<br>
नाशिक

के.के.वाघ शिक्षणसंस्थेचे,

# के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय,नाशिक.

## के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातर्फे भाषा विकसन कार्यक्रमाचे भव्य उद्घाटन

के.के.वाघ शिक्षणसंस्थेचे के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक यांचे वतीने दि.23 जानेवारी 2021 रोजी भाषा विकसन कार्यक्रम (इंग्रजी) चे भव्य उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भूषण कर्डिले होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा.प्राध्यापक श्री.यशवंत ढगे हे उपस्थित होते. दीपप्रज्वलन मा.डॉ.भूषण कर्डिले, मा.प्रा.यशवंत ढगे,सौ.अश्विनी पवार, डॉ.निशा एंडाईत, सौ.अमृत राव यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.यशवंत ढगे यांनी इंग्रजी भाषा शिकणे किती सहजसुलभ आहे हे सांगून इंग्रजी भाषेचा प्रभाव आपल्या स्वतःच्या व्यक्तीमत्वावंर होत असतो हे सांगितले. तसेच इंग्रजी भाषा किती गमतीशीर आहे हे सांगण्यासाठी Conceive and Delivery या शब्दांचे उदाहरण दिले. आपण आपले उच्चार कसे विकसित करू शकतो, यासाठी काय प्रयत्न केले पाहिजे हे स्पष्ट केले. या भाषा विकसन कार्यक्रमासाठी प्रा. ढगे यांनी स्वतः साहित्य तयार केले असून त्यात दैनंदिन जीवनातील प्रसंग इंग्रजीत कसे बोलावेत याची नोंद केलीय, छोटया छोटया टेबलच्या आधारे वाक्य तयार करण्यासाठी मार्गदर्शन केलेय. दैनंदिन संवादांची पुस्तिका तयार केली आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणत मा.प्राचार्य डॉ.भूषण कर्डिले यांनी आज इंग्रजी भाषा कशी जागतिक झाली आहे हे सांगून कोणतीही भाषा शिकण्यासाठी आधी ती ऐकली पाहितजे मग ती बोलता आली पाहिजे, नंतर वाचता आली पाहिजे आणि शेवटी लिहिता आली पाहिजे म्हणजेच भाषा शिकण्यासाठी मुलाचा आधी कान तयार करावा, नंतर जीभ, डोळे आणि स्वतःच्या मेंदूच्या आधारे विचारक्षमता विकसित करून लेखन करता आले पाहिजे. या भाषा विकसन कार्यक्रमासाठी विद्यार्थ्याला प्रत्येक कौशल्याचे जास्तीत जास्त अनुभव द्यावेत म्हणजे ती भाषा बोलण्यास जास्त मदत होते असे सांगितले.

यानंतर डॉ.निशा एंडाईत यांनी इंगजी चित्रपटाच्या सहा याने आपण किती सहजतेने इंग्रजी भाषा शिकू शकतो हे सांगितले. इंग्रजी चित्रपट पाहताना कोणत्या घटकांची काळजी घ्यावी हे सांगितले आणि Alternative Maths ही शॉर्ट फिल्म दाखविली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. योगिता भामरे आणि किर्ती चित्ते यांनी केले. अतिथी सत्कार प्राचार्य अश्विनी पवार यांनी केले तर अतिथी परिचय निशा एंडाईत यांनी केले व कार्यक्रमाचे प्रास्तारवि प्रा.योगिता भामरे यांनी केले. आभार सौ.कोमल निकम यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.उषा क्षत्रिय प्रा.दिपाली सूर्यवंशी, प्रा.सुवर्णा बत्तासे, प्रा.पल्लवी सावकार के.के.वाघ इंग्लिश स्कूल,नाशिक येथिल माधुरी निफाडे, सुचेता विसपूते, यांच्यासह शुभम भालेराव, दर्शना लोखंडे यांचे सहकार्य लाभले.

प्राचार्य,<br>के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय,<br>नाशिक

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षणसंस्था,
के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
डी. जी. पी. नगर - १ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई-मेल- Principal-bed@kkwagh.edu.in

दिनांक:-२६/०८/२०२१

# लसीकरण अहवाल

के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक मध्ये प्रथम वर्ष बी. एड. अभ्यासक्रमाच्या समाजसेवा कार्यांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या सभोवतालच्या १० व्यक्तींचे लसीकारणाचे अहवाल लिहिण्यास सांगण्यात आले होते. यामध्ये व्यक्तींचे नाव, फोन नंबर, पत्ता, जन्मतारीख, लसीकरणाची तारीख, स्थळ तसेच कितवा डोस घेण्यात आला अशी सर्व माहिती लिहिण्यात सांगण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सर्व सुचनेचे पालन करून अहवाल विभाग प्रमुखाकडे जमा केले.

या कार्यासाठी के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण वसंतराव कर्डिले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक

प्राचार्य
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षणसंस्था,
के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
डी. जी. पी. नगर - १ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई-मेल- Principal-bed@kkwagh.edu.in

दिनांक:- २०/०८/२०२१

## 'इको फ्रेंडली गणेशा' online कार्यशाळा

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एकचेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सेलन्स यांचे संयुक्त विद्यामाने शुक्रवार दिनांक २०/०८/२०२१ रोजी के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक येथे 'इको फ्रेंडली गणेशा' म्हणजेच शाडूमातीपासून गणेश मूर्ती बनविण्याबाबत ऑनलाईन कार्यशाळा राबविण्यात आली होती. त्यासाठी ऑनलाईन रजिस्टेशन विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक होते.

यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. शाडूमातीपासून निसर्गाला कोणतेही नुकसान होणार नाही या दृष्टिकोनातून हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना मूर्ती बनविण्याची कला शिकण्यास मिळाली आणि त्यांच्या ज्ञानात भर पडली. कार्यशाळा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना नवीन कला शिकता आली.

ऑनलाईन कार्यशाळा राबवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण वसंतराव कर्डिले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

नाशिक

प्राचार्य
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षणसंस्था,
के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
डी. जी. पी. नगर - १ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई-मेल- Principal-bed@kkwagh.edu.in

दिनांक:-२१/०९/२०२१

## डॉ. चंद्रकांत संकलेचा यांचे व्याख्यान

के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक तर्फे दि.२१/०९/२०२१ रोजी डॉ. चंद्रकांत संकलेचा यांचे "Effect of changing lifestyle on woman's health" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी माननीय प्राचार्य डॉ. भूषण वसंतराव कर्डिले, कार्यक्रम समन्वयक प्रा. किर्ती चित्ते, प्रा. अश्विनी पवार, प्रमुख अतिथी डॉ. चंद्रकांत संकलेचा उपस्थित होते. यावेळी डॉ. संकलेचा यांनी बदलते वातावरण तसेच स्त्रियांनी घ्यावयाची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच महिलांना येणारा ताण कसा नियंत्रित ठेवावा यावर योग्य मार्गदर्शन केले. स्त्रियांनी त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्यावे यासाठी आहाराचे महत्व स्पष्ट केले.

घरातील जबाबदाऱ्या पार पाडत स्वता:चे स्वप्ने पुर्ण करण्यास प्रोत्साहन दिले. प्रतिकूल परिस्थितीत स्वत: खंबीर रहावे यासाठी योगासने करावीत असा सल्ला डॉ. चंद्रकांत संकलेचा यांनी दिला. व्याख्यानास महाविद्यालयातील प्रा. उषा क्षत्रिय, प्रा. योगिता भामरे, प्रा. किर्ती चित्ते, प्रा. दिपाली सुर्यवंशी, प्रा. सुवर्णा बत्तासे आणि प्रा. राजेश्वरी पगारे तसेच विद्यार्थी सहभागी होते.

कार्यक्रमाप्रसंगी श्री.सोमनाथ गाजरे, श्री. निरंजन शहाणे, श्री. सुरेश आहेर, सौ. भाग्यश्री झोमन, श्री. भिकन बडगुजर आणि सौ. जयश्री भोळे उपस्थित होते.

प्राचार्य
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक